
हवेतून वीज उत्पन्न करणारा मुलगा

एका खऱ्याखुऱ्या हीरोची गोष्ट


लेखक: विल्यम कांकवाम्बा, ब्रायन मीलर

चित्रे: एलिझाबेथ झुनोन



मराठी अनुवाद:

सुशील मेन्सन



मलावी देशातील एका छोट्याशा गावातील लोकांकडे पैसा-अडका नव्हता. त्यामुळे त्यांना घरात वीज आणणं परवडत नव्हतं. वीज नसल्यामुळे त्यांच्या घरांमध्ये विजेचे दिवे नव्हते. अंधार पडल्यावर गरीब शेतकरी लवकर झोपी जात. पण विल्यमचं मात्र काही आगळंच होतं. त्याला स्वप्नांच्या जगात वावरायला हा अंधारच बरा वाटे.






विल्यमला वस्तुंची मोडतोड करून पाहायला, नवं काही बनवायला फार आवडे. त्याने बनवलेला एक ट्रक त्याच्या बिछान्याजवळ पडला होता. विल्यमने त्या ट्रकला चाकं म्हणून बाटलीची झाकणं लावली होती. एकदा रेडिओवर संगीत ऐकल्यावर तो रेडिओ उघडून ते संगीत वाजवणारा वाद्यवृंद आतमध्ये कुठे दिसतो का, ते शोधत बसला.

“जर मला संगीत ऐकू येतं, तर मग त्याचा वाद्यवृंद कुठाय?”



गर्द अंधाऱ्या खोलीत विल्यमच्या कानात आजोबांच्या जादुच्या गोष्टी कुजबूज करत. त्याच्या खिडकीसमोरून चेटकिणी विमानांच्या रुपात उडत. त्याच्या खोलीभर भुतं नाचत.







पहाटे विल्यम शेतात मक्याच्या रोपट्यांच्या रांगांमध्ये त्या जादुई प्राण्यांचा शोध घेई. मग रस्त्यावर धावणारा ट्रक बघून त्याला नवल वाटे. *या ट्रकचं इंजिन काम कसं करतं?*

“कुदळ काळजीपूर्वक फेक!” त्याचे वडील ओरडत. “नाहीतर आपला पाय कापून घेशील.”

पण नाचणाऱ्या आणि उडणाऱ्या जादुई गोष्टींमध्ये शक्ति असूनसुद्धा त्यांची जादू पाऊस मात्र पाडू शकली नाही.

पाण्याशिवाय, सूर्य दर सकाळी रागारागाने उठू लागला आणि शेताला होरपळून काढू लागला. त्यामुळे मक्याच्या रोपट्यांची अक्षरशः माती झाली. अन्न नसल्यामुळे मलावी गाव भुकेने तडफडू लागलं.








मग विल्यमच्या वडिलांनी आपल्या मुलांना जवळ बसवलं आणि म्हटलं, “आजपासून आपण दिवसातून फक्त एकदाच जेवायचं. कमी खा.”

संध्याकाळी, कंदिलाच्या सभोवती बसून त्यांनी मूठभर अन्न खाल्लं. त्यावेळी भुकेले लोक रस्त्यांवर भुतांसारखे भटकत होते.



पाऊस नसल्याने लोकांकडील पैसा गायब झाला.

“विल्यम,” वडील म्हणाले. “मला वाईट वाटतंय. तुला शाळा सोडावी लागेल.”

विल्यम रस्त्यावर उभा राहिला आणि शाळेत जाणाऱ्या नशीबवान मुलांकडे पाहू लागला. त्याच्या पोटात भुकेचा डोंब उसळला होता आणि घशात आवंढा अडकला होता. अनेक दिवस तो आंब्याच्या झाडाखाली फुरंगटून बसू लागला. मग त्याला रस्त्याच्या दुसऱ्या टोकाला असलेलं ग्रंथालय आठवलं. अमेरिकी लोकांनी त्याच्या देशाला ही अमूल्य भेट दिली होती.

तिथे विल्यमला सुंदर सुंदर चित्रं असलेली विज्ञानाची पुस्तकं दिसली. त्याने एका इंग्रजी शब्दकोशाच्या मदतीने, *इंजिन विशाल ट्रकला इथून तिथे कसं नेतो, रेडिओ आकाशातून आलेलं संगीत आपल्यापर्यंत कसं पोहोचवतो* हे समजून घेतलं. पण विल्यमला सर्वाधिक आकर्षण वाटलं ते महाकाय पंख्यासारखी पाती असलेल्या एका यंत्राचं. हे यंत्र सर्वात उंच झाडाहूनही उंच होतं.






एक महाकाय फिरकी?

जादू पकडणारी एखादी वस्तू?



हळूहळू त्याच्या मनात चित्र स्पष्ट होत गेलं:

“पवनचक्की वीज उत्पन्न करू शकते आणि पंप चालवून पाणी वर खेचू शकते.




त्याने आपले डोळे बंद केले आणि आपल्या घराच्या बाहेर एक पवनचक्की उभी आहे, अशी कल्पना केली. ती वाऱ्याच्या झुळकांमधून वीज खेचत होती आणि गर्द अंधाऱ्या दरीला प्रकाशाने उजळून टाकत होती.




पवनचक्की जमिनीतून थंड पाणी वर खेचत आहे, सुकलेल्या शेतांना पाजून त्यांची तहान भागवत आहे, त्यामुळे मक्याची रोपटी उंच वाढत आहेत, ती हिरवीगार झाली आहेत, शेतकऱ्यांच्या प्रार्थनेमुळे पाऊस पडला नसला तरी पवनचक्कीमुळे हे शक्य झालेलं आहे असं त्याला दिसलं.

पवनचक्की एका यंत्रापेक्षा जास्त काहीतरी होतं.

तो भुकेशी लढण्याचं एक हत्यार होतं.




“मी हवेतून वीज उत्पन्न करीन,” तो पुटपुटला.



भंगार सामानाच्या आवारात गंज लागलेल्या लोखंडी वस्तुंचा खजिना विखुरला होता. एक ट्रॅक्टरचा पंखा, काही पाईप, बियरींग आणि उघडायला खूप ताकद लागेल असे गंजलेले बोल्ट.

“टोंगा!” आपलं हे भंगाररुपी बक्षीस निवडत विल्यम पक्ष्यांवर आणि कोळ्यांवर ओरडला.

विल्यमने ते भंगार ओढतओढत घरात आणताच लोक बोलू लागले, “हा मुलगा वेडा झालाय. बघा कसा कचऱ्याशी खेळतोय तो!”



काही आठवड्यांनी, विल्यमने आपल्या यंत्राचे तुकडे जमिनीवर व्यवस्थित लावले. त्यात होती एक तुटलेली सायकल, गंज लागलेल्या बाटल्यांची झाकणं, प्लास्टीकचे पाईप आणि एक छोटंसं जनित्र, जे सायकलच्या दिव्याला वीज पुरवतं.



तीन दिवस विल्यमने ठोकाठोकी केली, नट-बोल्ट घट्ट केले. आजुबाजूला कोंबड्यांची पिल्लं कर्कश आवाज करत होती, कुत्रे भुंकत होते. शेजारीपाजारी माना डोलवून म्हणत होते, “हा वेडा काय करतोय आता?”





त्याचा चुलत भाऊ *जोफ्री* आणि घनिष्ठ मित्र *गिल्बर्ट* त्याच्या सोबतीला आले.

“हॅलो,” त्यांनी अभिवादन केलं. “हवेतून वीज तयार करायला तुला आम्ही काही मदत करू का?”


“आपल्या कुऱ्हाडी उचला आणि माझ्या मागोमाग या,” म्हणत तो त्यांना जंगलात घेऊन गेला.

जंगलात त्यांनी आपल्या धारदार कुऱ्हाडीने झाडाच्या फांद्या कापल्या. मग हातोड्याने खिळे ठोकून-ठोकून त्यांनी एक लाकडी मनोरा बनवला.



वर चढून विल्यम ओरडला, “वर उचला ते!”

मुलांनी यंत्र मोठ्या कष्टाने वर उचललं. खाली लोकांची गर्दी जमा झाली. सर्व लोक या विचित्र यंत्राकडे टक लावून बघू लागले. यंत्र झोकांड्या खाणाऱ्या जिराफागत खाली झुकू लागलं, डुगडुगू लागलं. काही लोक फीदीफीदी हसू लागले, थट्टा करू लागले. विल्यम मात्र वाऱ्याची वाट पाहू लागला.



काही वेळाने वारा आला, नेहमीसारखाच.

आधी एक झुळूक आणि
मग जोरदार झोत.


लाकडी मनोरा हेलकावे खाऊ लागला आणि पाती गोलगोल फिरू लागली.




दुखरी बोटं आणि पोटातील भूक विसरून विल्यमने आपल्या अंधाऱ्या खोलीतील एका छोट्याशा दिव्याला तारा जोडल्या. दिवा सुरुवातीला लुकलुकला आणि मग एकदम सूर्यासारखा तेजाने लखलखू लागला.

“कमाल झाली!” तो ओरडला. “मी हवेतून वीज बनवली!”







“शाब्बास!” एक माणूस ओरडला.

शंका घेणाऱ्या लोकांनी टाळ्या वाजवल्या आणि जयघोष केला.


ही फक्त सुरुवात आहे, हे विल्यम जाणत होता.

वीज रिकामं पोट तर भरू शकत नव्हती.

पण पवन चक्की ओसाड जमीन पाण्याने ओली करू शकत होती.

त्यामुळे अन्न पिकू शकत होतं, जे लोकांचं पोट भरणार होतं.

“हवेतून बनलेली वीज माझ्या देशाला खायला घालू शकते,” विल्यमच्या मनात आलं.



ही सर्वात मोठी अद्भूत जादू होती.





विल्यम कांकवाम्बाचा जन्म 1987 साली मध्य मलावीतील विम्बे गावात झाला. मलावी आणि आफ्रिकेतील इतर लोकांसारखंच विल्यमचे वडील *ट्रायवेल* हेसुद्धा शेतकरी होते. कांकवाम्बा कुटुंब आपल्या शेतात पांढरा, गोड मका पिकवत. त्याची लापशी बनवून ती रोजच्या जेवणात ते खात. या लापशीला ते *शिमा* म्हणत. कपडे, औषधं आणि इतर आवश्यक वस्तुंसाठी लागणारा पैसा कमावण्यासाठी ते तंबाखूही पिकवत. हा तंबाखू ते राजधानी *लिलोंग्वे* येथे विकत. त्यांचे अन्न फक्त जमिनीतूनच येत असल्याने हवामानात बदल झाला किंवा बियाणं, खतं यांच्या किंमती वाढल्या की त्यांच्यासमोर संकट उभं राहात असे.

2001 आणि 2002 साली असंच घडलं. गंभीर सुक्या दुष्काळात मलावीतील बहुतांशी मक्याची पिकं मरून गेली. यात विल्यमच्या वडिलांचं शेतही होतं. काही महिन्यांतच, संपूर्ण देशांतील अन्नसाठा संपुष्टात आला. लोक भुकेले राहू लागले. तो एक भयानक दुष्काळ होता. दररोज फक्त एक वेळ जेवल्यामुळे विल्यम, त्याचे आईवडील आणि सहा बहिणी यांचं वजन कमी होऊ लागलं. काही काळाने, विल्यमच्या वडिलांना भुकेमुळे तात्पुरतं अंधत्व आलं. या दुष्काळात मलावीतील दहा हजार लोकांचा मृत्यू झाला. यात विम्बेतीलही अनेक लोक होते.

शाळेची फी (मलावीत अमेरिकेसारखं शाळा मोफत नव्हती) भरायला पैसा नसल्यामुळे विल्यमला शाळा सोडावी लागली. पण इथे-तिथे भटकण्याऐवजी, तो अमेरिकी सरकारने सुरू केलेल्या एका ग्रंथालयात जाऊ लागला. तिथे त्याने विज्ञानाची पुस्तकं वाचली जी त्याला खूप आवडली. विल्यमचं इंग्रजी कच्चं होतं, म्हणून तो शब्दकोशाची मदत घेऊ लागला. पुस्तकातील चित्रांनी विल्यमला आकर्षित केलं. त्यांच्यामध्ये एक पवनचक्कीचं चित्र होतं. पवनचक्की वीज उत्पन्न करू शकते, पंप चालवू शकते हे त्यात लिहिलं होतं. मलावीतील बहुतेक घरांसारखंच, विल्यमच्या घरीसुद्धा वीज नव्हती. पवनचक्कीद्वारे पाणी पंप करून वडिलांच्या शेताचं सिंचन करता आलं असतं.

“मी एक पवनचक्की बनवणार, हे नक्की!” विल्यमने मनाशी पक्कं केलं.



विल्यमने आपली पवनचक्की बनवण्यासाठी ट्रॅक्टरचा पंखा, धक्का शोषक, एक चाक नसलेल्या सायकलचा सांगाडा हे भंगारातील सामान वापरलं. आगीवर प्लास्टीकचे पाईप वितळवून, त्यांना चपटं करून, आकार देऊन त्याने पंख्याची पाती बनवली. जनित्रासाठी त्याने छोट्या बाटलीच्या आकाराचा डायनॅमो वापरला. त्यात तारेच्या वेटोळ्यांमध्ये एक चुंबक वेगाने फिरून वीज उत्पन्न करते. याला *विद्युत चुंबकत्व* म्हणून ओळखलं जातं. वारा वेगाने वाहू लागला की पंखे पॅंडलसारखं काम करू लागत आणि एका टायरला फिरवत. त्यामुळे डायनॅमोतील वेटोळे फिरून वीज उत्पन्न होत असे.

डायनॅमोची एक तार विल्यमने आपल्या खोलीत आणली. एका छोट्या दिव्याला तार जोडताच दिवा प्रकाशित झाला. त्यावेळी विल्यम फक्त चौदा वर्षांचा होता.

अखेरीस, विल्यमने आपल्या पवनचक्कीचा उपयोग कारची बॅटरी चार्ज करण्यासाठी केला. त्यातून त्याने आपल्या आईवडिलांच्या घरी चार दिवे प्रकाशित केले. पण पाणी पंप करायचं त्याचं स्वप्न कित्येक वर्षांनंतर तेव्हा पूर्ण झालं जेव्हा त्याने *ग्रीन यंत्र* बनवलं. त्याच्या मदतीने त्याने आपल्या घरानजिक असलेल्या लहानश्या विहिरीतून पाणी वर खेचलं आणि आईच्या बागेत फवारलं. त्यामुळे वर्षभर त्यांना भाज्या पिकवता आल्या. 2007 साली, विल्यमला काही पत्रकारांनी शोधून काढलं आणि टांझानियात टेड (TED) समारंभात बोलण्यासाठी त्याला आमंत्रित केलं. विल्यम ना कधी विमानात बसला होता, ना कधी त्याने इंटरनेट बघितलं होतं. कित्येक लोक विल्यमची कहाणी ऐकून खूप प्रभावित झाले आणि त्यांनी त्याला शाळेत परत पाठवण्यासाठी आणि सौर उर्जेवर चालणारा पंप बनवण्यासाठी पैशाची मदत केली. या मदतीमुळे त्याच्या वडिलांच्या शेताला पाणी मिळण्याची सोय झाली आणि भुकेपासून त्यांची कायमची मुक्तता झाली.

विल्यम आता न्यू हॅम्पशायर प्रांतातील हॅनोव्हर शहराच्या डार्टमाउथ कॉलेजचा विद्यार्थी आहे. तो इंजिनिअर बनण्याचं शिक्षण घेत आहे. गावांमध्ये वीज आणि पाणी पंपासाठी सौर आणि पवनउर्जेवर काम करण्यासाठी मलावीला परतण्याची योजना तो आखत आहे.